# चिमूटभर खाण्याच्या सोड्यामुळे शरीराचे शुद्धीकरण


आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** शेतीमध्ये गेल्या काही वर्षांत कीटकनाशकांचा वापराचे प्रमाण वाढत आहे. कीटकनाशकांचा शरीरातील विषारी प्रभाव शास्त्रज्ञांना चिंतित करत आहे. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, पिण्याच्या पाण्यात एक चिमूटभर बेकिंग सोडा टाकल्याने शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर काढण्यास मदत होऊ शकते. जरी आपण सेंद्रिय पदार्थ खाल्ले आणि फिल्टर केलेले पाणी प्यायले, तरीही अल्प प्रमाणात ग्लायफोसेट जे तणनाशक म्हणून वापरले जाते ते अन्नावाटे शरीरात जाते. त्यामुळे लिम्फोमा, कर्करोग, पार्किन्सनसारखे दीर्घ आजार होऊ शकतात. हे विष बाहेर काढण्यासाठी पाण्यात एक चिमूटभर बेकिंग सोडा दररोज मिसळण्याची शिफारस तज्ज्ञांकडून करण्यात आली आहे.

चेन्नईच्या प्राम्मेटिक न्यूट्रिशनच्या मुख्य आहारतज्ज्ञ मीनू बालाजी यांनी सांगितले की, ग्लायफोसेट या तणनाशकामुळे पाचन समस्या आणि कर्करोग होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. अभ्यासाअंती असे दिसून आले की, बेकिंग सोडा उत्पादनाच्या पृष्ठभागावरून ग्लायफोसेट काढून टाकू शकतो, परंतु शरीरातील ग्लायफोसेट काढण्याबाबत मात्र याचे भक्कम वैज्ञानिक पुरावे नाहीत. जरी बेकिंग सोडा ग्लायफोसेट पृष्ठभागावरून काढून टाकत असला, तरी ते वनस्पतींच्या इतर भागांमध्ये देखील आढळते. त्यामुळे काही फळे खाण्यापूर्वी सोलून घ्यावी, सेंद्रिय पदार्थांचा वापर वाढवावा, ग्लायफोसेट मुक्त उत्पादने वापरण्यावर भर द्यावा, असे आहारतज्ज्ञांनी म्हटले आहे.

आपल्या प्रगतीसाठी कॉसमॉस
प्रॉपर्टी मॉर्टगेज लोन
व्याजदर फक्त 9.75%*
₹ ५ कोटींपर्यंत कर्ज उपलब्ध*
कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
Toll Free No.: 1800 233 0234

गरम हवामानात शिरोधाराचे फायदे




• पित्तदोषाचे संतुलन राखते
• शरीराला आतून थंडावा मिळतो
• पचनशक्ती सुधारते • मानसिक शांतता प्राप्त होते
• उष्णतेमुळे साचलेले दोष बाहेर टाकते
शास्त्रोक्त पद्धतीने योग्य ते पंचकर्म जरूर घ्या.
वेळ : स. 11 ते सायं. 7 वा.
नाव आजच नोंदवा
DR. RUCHA'S Tanvi NavTej PANCHAKARMA
डॉ. रुचाज् तन्वी नवतेज पंचकर्म
ठाणे
9082911530

# वयाची अट गुंडाळून मंडळ अध्यक्षांच्या नेमणुका

## आमदारांच्या शिफारशींस प्राधान्य; पक्षविरोधी काम केलेल्यांस बक्षिसी

**लोकसत्ता वार्ताहर**

**नांदेड :** भारतीय जनता पार्टीने आपल्या संघटनात्मक निवडणुकीत मंडळ अध्यक्षपदासाठी वयोमर्यादा निश्चित केल्यानंतरही जिल्ह्यातील काही मंडळांमध्ये ही अट गुंडाळून टाकत अध्यक्ष निवडण्यात आल्याचे समोर आले आहे. बहुतांश ठिकाणी पक्षाच्या संबंधित आमदारांचा कल पाहून अध्यक्ष निवडण्यात आले. पक्षविरोधी काम केलेल्यांनाही संधी देण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात शहरासाठी महानगराध्यक्ष आणि ग्रामीण भागासाठी उत्तर आणि दक्षिण विभागाचे दोन जिल्हाध्यक्ष अशी भाजपाची संघटनात्मक रचना असून, या तीन संघटनात्मक जिल्ह्यांत ४७ मंडळे निर्माण करण्यात आली आहेत. गेल्या आठवड्यात मुंबईमध्ये पक्षाचे जिल्ह्यातील आमदार-खासदार आणि अन्य संबंधितांची बैठक झाली होती. त्यानंतर पक्षाने जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व मंडळांचे अध्यक्ष मुंबईतच निश्चित करून टाकल्याचे समोर आले आहे.

मागील काही महिन्यांपासून महाराष्ट्र भाजपामध्ये 'संघटन पर्व' सुरू असून, राज्याच्या पक्ष निवडणूक अधिकारी यांनी प्रत्येक जिल्ह्यासाठी निवडणूक अधिकारी नियुक्त करून निवडणूक प्रक्रियेचे वेळापत्रक आखून दिले होते; पण शेवटी आमदार आणि प्रमुख नेत्यांच्या शिफारशीचा मान राखला गेला, असे पक्षातूनच सांगण्यात आले.

पक्षातील मंडळ अध्यक्षपदासाठी निवडणूक अधिकारी यांनी ३५ ते ४५ अशी वयोमर्यादा निश्चित करून दिली होती. पण खासदार अशोक चव्हाण यांच्या प्रभावक्षेत्रातील बालाजी गव्हाणे यांची अर्धापूर ग्रामीण मंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली. ते आता ५२ वर्षांचे आहेत, (जन्मसाल १९७३) असे सांगण्यात आले.

मुदखेड ग्रामीण मंडळ अध्यक्षपदासाठी बारडचे राजाराम ऊर्फ बाळू बारडकर हे इच्छुक होते. पण त्यांचे नाव वयाच्या अटीमुळे आधीच बाद झाले. खासदार चव्हाण यांनी गव्हाणेंच्या बाबतीत जो अपवाद केला, तो बारडकरांसाठी करण्यात आला नाही. ज्येष्ठ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कट्टर समर्थक भागवत देवसरकर हे हदगाव पूर्व मंडळाचे अध्यक्ष झाले आहेत.

नांदेड महानगरातील ९ मंडळांचे अध्यक्षही निश्चित झाले असून, त्यातील विश्वंभर शिंदे यांनीही वयोमर्यादा पार केलेली आहे. अन्य काही मंडळ अध्यक्षांनी विधानसभा निवडणुकीत बंडखोर उमेदवाराचा प्रचार केला होता; पण पक्षाने त्यांना मंडळ अध्यक्षपदाची बक्षिसी दिली आहे. जंगमवाडी मंडळात आशिष नेरळकर यांची फेरनिवड झाली आहे.

### 'नांदेड उत्तर'चे नवे मंडळ अध्यक्ष

किनवट शहर - स्वागत आयनेनिवार, किनवट उत्तर - उमाकांत कराळे, किनवट दक्षिण - सूर्यकांत आरडकर, माहूर - नीळकंठ मस्के, हदगाव शहर - बालाजी कदम पाटील, हदगाव पूर्व - भागवत देवसरकर, हदगाव पश्चिम - सूर्यकांत हनवते, हिमायतनगर - गजानन चायल, अर्धापूर शहर - योगेश हळदे, अर्धापूर ग्रामीण - बालाजी गव्हाणे, मुदखेड ग्रामीण - दतू देशमुख, मुदखेड शहर - रामसिंग चव्हाण, भोकर ग्रामीण - दिवाकर रेड्डी सुरकुंटवार, भोकर शहर - विशाल विठ्ठल माने.

### 'नांदेड शहर' नवे मंडळ अध्यक्ष

जंगमवाडी - आशिष नेरळकर, शिवाजी नगर - अमित वाघ, उत्तर ग्रामीण - बापुराव पावडे (बंडू पावडे), तरोडा - सांगवी - सुनील राणे, नवा मोंढा - भालचंद्र पवळे, सिडको - सचिन रावका, नांदेड द. ग्रामीण - विश्वंभर शिंदे, हनुमान पेठ - अंबादास जोशी, गाडीपुरा-चौफाळा - आशिष ठाकूर.

### राज्य पातळीवरील चित्र

महाराष्ट्रातील पक्षसंघटनेत २५८ नव्या मंडळांची निर्मिती करून ती संख्या १ हजार २२१ केली आहे. त्यातील ९५३ मंडळांच्या अध्यक्षांच्या नियुक्तीची प्रक्रिया प्रदेश भाजपाचे कार्याध्यक्ष तथा माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण करण्यात आली. मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यातील मंडळांची संख्या २०७ आहे.

# पद्मश्री चैतराम पवार यांचा आज नागरी सत्कार

## डॉ. धुमाळे, डॉ. सुशील राठी यांची माहिती

**लोकसत्ता वार्ताहर**

**नांदेड :** धुळे जिल्ह्यातल्या बारीपाडा प्रारूपामुळे देश-विदेशात ओळखल्या जाणाऱ्या चैतराम पवार यांचा सोमवारी नांदेडमध्ये नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. भारत सरकारने त्यांना नुकताच पद्मश्री पुरस्कार दिला आहे.

धुळे जिल्ह्यातल्या बारीपाडा गावात शाश्वत विकासाचे यशस्वी प्रयोग करून या गावाचा त्यांनी भरीव विकास केला. पर्यावरणाचे संरक्षण आणि वनवासी बांधवांचा सर्वांगीण विकास, समाजाच्या परंपरा अबाधित राखणे, समाजाला स्वावलंबी बनवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्यातील चिकाटी व अंगमेहनतीचा राष्ट्रकार्यात वापर व्हावा, यासाठी गेल्या तीस ते ३५ वर्षांपासून अथक परिश्रम करणारे चैतराम पवार यांचे अफाट कार्य जगासमोर आले आहे.

भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविले आहे. देवगिरी कल्याण आश्रमाचे प्रांताध्यक्ष असलेल्या चैतराम पवार यांचे अनुभव कथन ऐकता यावे, यासाठी उद्या (सोमवारी) सायंकाळी साडेसहा वाजता त्यांचा कुसुम सभागृहात भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा भारतीचे तसेच अखिल भारतीय संयुक्त महामंत्री विजय पुराणिक हे प्रमुख वक्ते म्हणून असणार आहे. त्यांचे यावेळी मार्गदर्शन होणार आहे.

# देगलूरमध्ये दुकानाला आग

**लोकसत्ता वार्ताहर**

**नांदेड :** शहरातील देगलूर नाका परिसरात असलेल्या काका प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर या दुकानाला आग लागून झालेल्या दुर्घटनेत सुमारे ३० ते ४० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. शॉर्कसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज आहे.

दुर्घटनाग्रस्त दुकान हे वेगवेगळ्या फोमसह प्लायउड, रंग कामाला लागणाऱ्या साहित्याचे दालन आहे. रविवारी सकाळी हे शोरूम उघडण्यात आले. दुपारी पावणेतीन वाजण्याच्या सुमारास दुकानाच्या एका बाजूला आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर स्थानिकांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती दिली.

# वरातीत नाचताना भांडण; युवकाची आत्महत्या

**लोकसत्ता वार्ताहर**

**जालना :** लग्नाच्या वरातीत नाचताना काही जणांशी भांडण झाल्यामुळे एका सोळा वर्षाच्या मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना जालना शहरातील चंदनझिरा भागात घडली. याप्रकरणी या मुलाच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याच्या आरोपावरून चंदनझिरा पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रोहन राहुल साळवे (वय १६) असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव असून चंदनझिरा भागात त्याचे घर आहे. चंदनझिरा भागात एका लग्नाच्या वरातीत तो सहभागी झाला होता. वरातीमध्ये डीजेच्या गाण्यावर नाचताना काही जणांसोबत त्याचे भांडण झाले. त्यानंतर त्याचे वडील त्याला घरी घेऊन आले होते. परंतु ज्यांच्याशी भांडण झाले ते नंतर त्यांच्या घरासमोर आले होते. काही जणांनी समजूत घातल्यावर ते निघून गेले. ज्यांच्याशी भांडण झाले ते घरासमोर येऊन गेल्याचे पाहिल्यानंतर रात्री रोहनने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## जाहीर प्रसिद्धीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) मुख्य नियम २०१४ व सुधारित नियम २०१७ चे नियम १८ मधील तरतुदीनुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ०५ यांच्या वैधानिक कार्यक्षेत्रातील ब प्रकारातील खालील सहकारी संस्थेचा निवडणूक कार्यक्रमाची घोषणा मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेली आहे. सदर निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव, पदनाम व मोबाईल क्रमांक | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याचा दिनांक व वेळ | मतदानाचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयः उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर- २, टिळक रोड, क्षेत्रीय कार्यालय, दुसरा मजला, शुक्रवार पेठ, पुणे- ४११ ००२. दु. क्र. ०२०-२४४३३१३ | | | | | | |
| १ | भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार लि., भारती विद्यापीठ भवन, १३, सदाशिव पेठ, लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे- ४११०३० | श्रीमती निलम पिंगळे, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर- २, मो. नं. ९६०४३३०५९९ | दि. २१/०४/२०२५ ते २५/०४/२०२५ वेळ- स. ११.०० ते दु. ०३.०० पर्यंत | दि. २८/०४/२०२५ दुपारी ०१.०० | दि. २९/०४/२०२५ ते १३/०५/२०२५, स. ११.०० ते दु. ०३.०० पर्यंत | दि. २८/०५/२०२५ स. ०९.०० ते ०५.०० |

टिपः-

१. उपरोक्त सर्व सहकारी संस्थांचे मतदार संघ, समितीची रचना, निवडणुकीच्या विविध टप्प्यांच्या तारखा व वेळ इत्यादीबाबतचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संबंधित उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांचे कार्यालय, संबंधित संस्था कार्यालय व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर पाहावयास मिळतील.
२. मतदान व मतमोजणीचे ठिकाण आवश्यकतेनुसार संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय ्धिकारी यांचेकडून जाहीर करण्यात येईल.
३. संबंधित संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

(सही)
(संजय राऊत)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे

ठिकाणः पुणे
दिनांकः २१/०४/२०२५

## TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK

**नोंदणीकृत कार्यालय : टीजेएसबी हाऊस,** प्लॉट नं. बी ५, रोड नं. २, वागळे इंडस्ट्रियल ईस्टेट, ठाणे (पश्चिम)– ४००६०४. फोन : ०२२–६९९७ ८५००.

**वसुली कार्यालय :** दुकान नं. १/२, केसर प्लाझा अपार्टमेंट, माऊली लॉन्स जवळ, डीजीपी नगर, नाशिक– ४२२००९. फोन : २३७४३५१/५२

### ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेकरिता)

**सिक्युरिटायझेशन ॲक्ट, २००२ अन्वये सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियम २००२ च्या नियम ८(२) सह**

ज्याअर्थी, खाली सही करणार **टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडचे** प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांना मिळालेल्या अधिकारान्वये **सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (सरफेसी कायदा २००२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ३ सह कलम १३(१२)** अन्वये कर्जदार यांना **मागणी नोटीस** पाठवून सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **६० दिवसांचे आत** भरणा करण्याची मागणी केली होती. खाली उल्लेख केलेले कर्जदार हे बँकेची कर्ज रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने सर्वसामान्य जनतेस व खासकरुन कर्जदार यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या **कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोसमेंट) नियम २००२ च्या नियम ८ अन्वये** प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषत: खाली उल्लेखिलेले कर्जदार आणि सर्व सामान्य जनता यांना जाहीर सावधानतेची सूचना देण्यात येते की त्यांनी खाली उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार करू नये. जर असा कोणताही व्यवहार केला गेला तर तो **टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड**च्या खाली नमूद केलेल्या खर्चाच्या बोजासह असेल.

**मिळकतीवरील बोजा कर्जफेड करुन उतरवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेबाबत कर्जदाराचे ध्यान सदर कायद्याच्या कलम १३ उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येते.**

| कर्जदार/ जामीनदार/ गहाणखतदार यांचे नाव | मागणी नोटीस तारीख आणि येणे रक्कम रुपये | ताबा घेतल्याची तारीख आणि ठिकाण | स्थावर संपत्तीचे वर्णन |
|---|---|---|---|
| १. मेसर्स दर्शना हार्डवेअर आणि इलेक्ट्रिकल त्यांचे मालक श्री. जयदीपसिंग प्रल्हादसिंग राठोड ... कर्जदार<br>२. श्री.जयदीपसिंग प्रल्हादसिंग राठोड .... गहाणखतदार आणि जामीनदार<br>३. श्री राजेंद्रसिंह रामसिंग चव्हाण .... जामीनदार<br>४. श्री हदमतसिंग भगवान राजपुरोहित .... जामीनदार<br>एनआरओ वसुली विभाग कर्ज खाते क्र. 142/ODSR/1, 142/PRLNR/9 | मागणी नोटीस तारीख : २४.०६.२०२२<br>येणे रक्कम रुपये : दि. ३१.०५.२०२२ पर्यंत रू. २८,०३,९०७.३३ (अधिक पुढील व्याज आणि खर्चासह इ.) | तारीख : १६.०४.२०२४<br>ठिकाण : सिन्नर, नाशिक<br>(प्रत्यक्ष ताबा) | सिन्नर ता. सिन्नर, जि. नाशिक ४२२१०३ सर्व्हे नं. ९३२/२+३/३/१, ''उद्योगविश्व'' नावाच्या बिल्डींग मधील तळ मजल्या वरील दुकान नं. ८ क्षेत्र ५१.११.५ चौ. मी. म्हणजे ५५०.०० चौ. फूट. |

दिनांक : २१.०४.२०२५
स्थळ : नाशिक
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही/– प्राधिकृत अधिकारी, सरफेसी कायदा २००२ अन्वये टीजेएसबी बँकेकरिता

## TATA
## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत पत्ता :** ११वा मजला, टॉवर 'ए', पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.
**शाखेचा पत्ता :** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र.

### स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ३० दिवसीय ई-लिलाव सूचना.

आम जनतेस आणि विशेषकरून याखालील ऋणको/ सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार/ प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.कडे (टीसीएचएफएल)** गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकीत देणींच्या वसुलीकरिता ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' व ''जे काही आहे तेथे आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर २२.०५.२०२५ रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/ विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/ मालमत्तेची विक्री उक्त २२.०५.२०२५ रोजी दु. ०२.०० वा. ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेचा डिमाण्ड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**, ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र येथे २१.०५.२०२५ रोजी सांय ०५.०० वा पर्यंत किंवा तत्पूर्वी टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारीकडे सादर करण्यात यावा.

सुरक्षित मत्ता/ स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त तपशीलवार वर्णनानुसार ''जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | लोन अका. नं. | ऋणको/ सह-ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे | मागणी सूचनेनुसार रक्कम | राखीव किंमत | इसारा रक्कम | ताब्याचा प्रकार | थकीत देणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | TCHHL0601000100085224 & 10396498 | श्री. रामभरण राजनारायण पांडे श्रीमती मनिषा रामभरण पांडे | रु. ३,३८,७०१/- (रुपये तीन लाख अडतीस हजार सातशे एक फक्त) ॲग्रीमेन्ट नं. 10396498 अंतर्गत तुमच्याद्वारा देय व देणी आहे आणि रक्कम रु. ९१६५०६/-(रुपये नऊ लाख सोळा हजार पाचशे सहा फक्त) ॲग्रीमेन्ट नं. TCHHL0601000100085224 अंतर्गत व एकूण रु. १२५५२०७/- (रुपये बारा लाख पंचावन्न हजार दोनशे सात फक्त) तुमच्याद्वारा देय व देणी आहे/ १३.११.२०२३ | रु. १६,८८,४००/- (रुपये सोळा लाख अठ्याऐंशी हजार चारशे फक्त) | रु. १,६८,८४०/- (रुपये एक लाख अडुसष्ट हजार आठशे चाळीस फक्त) | प्रत्यक्ष | रु. ४,१९,३२२/- (रुपये चार लाख एकोणीस हजार तीनशे बावीस फक्त) ॲग्रीमेन्ट नं. 10396498 अंतर्गत तुमच्याद्वारा देय व देणी आहे आणि रक्कम रु. १०,७९,६४४/- (रुपये दहा लाख एकोणऐंशी हजार सहाशे चव्वेचाळीस फक्त) ॲग्रीमेन्ट नं. TCHHL0601000100085224 अंतर्गत व एकूण रु. १४,९८,९६६/- (रुपये चौदा लाख अठ्ठ्याण्णव हजार नऊशे सहासष्ट फक्त) तुमच्याद्वारा देय व देणी आहे. १४.०४.२०२५ रोजीप्रमाणे |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- सर्व्हे नं. ९३६/१/३+९३६/२ए+९३६/३, त्यापैकी प्लॉट नं. २२६ ते २२९, त्यावरील फ्लॅट नं. २०३, मोजमापाचा एरिया ३९.५ चौ.मी. व बाल्कनी/ टेरेसचा एरिया २.० चौ.मी., 'निमोहर व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'च्या विंग 'ए'मधील दुसऱ्या मजल्यावरील, सिन्नर व सिन्नर म्युनिसिपल काऊन्सिल, नाशिकच्या मर्यादेत.

लिलावाच्या स्थळी आम जनतेस त्यांच्या बोली व्यक्तिशः सादर करण्यास आमंत्रित करण्यात आले आहे. कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, या विक्रीसंबंधित बोलीकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही भुमिका बजावत असल्यास विक्री, तथापि, विकलेल्या मालमत्तेवरील कोणतेही हित संपादन करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणार नाही.

विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२ यामधील विहित आणि पुढील शर्तींच्या अनुसरणाच्या विषयाधीन राहील :

**नोंद :** मालमत्तेच्या ई-लिलावाचे आयोजन प्रत्येकी ५ मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह **२२.०५.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान** http://bankauctions.in/ या पोर्टलद्वारा करण्यात येईल.

**शर्ती व अटी :**

**१.** याखालील अनुसूचीतील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या उत्तम माहितीच्या आधारे दिलेला आहे; परंतु निम्नस्वाक्षरीकार या उद्घोषणेतील कोणतीही चूक, असत्यकथन किंवा लोपन याकरिता उत्तरदायी नसतील. बोली रक्कम किंवा बोलीदारासंबंधित कोणताही वाद उद्भवल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकाराच्या विषयाधीन लिलावात ठेवण्यात येईल. **२.** स्थावर मालमत्ता राखीव किमतीच्या खाली विकली जाणार नाही. **३.** बोलीवृद्धी रक्कम **रु. १०,०००/–** (रुपये दहा हजार फक्त) असणार आहे. **४.** मालमत्तेच्या खरेदीकरिता सादर केलेल्या सर्व बोली **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**च्या नावे, देय शाखेचा पत्त्यावर, डिमाण्ड ड्रॉफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार इसारा रकमेसमवेत असतील. डिमाण्ड ड्राफ्ट्स लिलावानंतर अयशस्वी बोलीदारास परत केले जातील. एनईएफटी/ आरटीजीएस/ आयएमपीएसद्वारा इरठेच्या प्रदानाकरिता, कृपया प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा. **५.** उच्चतर बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल, मात्र असे की, तो/ ती बोलीकरिता कायद्याने अर्हताप्राप्त असावा/ असावी आणि अधिक बोली रक्कम राखीव किमतीच्या कमी नसावी. उच्चतर बोलीची स्वीकृती किंवा नापसंती 'प्राधिकृत अधिकारी'च्या स्वेच्छाधिकारावर राहील, जेव्हा दिलेली किंमत स्पष्टपणे त्यांना अपुरी वाटल्यास त्यांना तसे करणे भाग पडल्यास. **६.** अभिलिखित कारणे देऊन विक्री स्थगित करण्याचा/ खंडित करण्याचा स्वेच्छाधिकार 'प्राधिकृत अधिकारीं'चा राहील. **७.** स्थावर मालमत्तेची पाहणी **१४.०५.२०२५ रोजी स. ११.०० व सायं. ०५.०० दरम्यान** भेटीची पूर्ववेळ ठरवून करता येईल. **८.** यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेली व्यक्ती, सदर घोषणेनंतर त्वरित, खरेदी रक्कम/ बोली रकमेच्या पंचवीस टक्के ठेव जमा करील, ज्यामध्ये २४ तासांच्या आत प्राधिकृत अधिकारींकडे जमा करावयाची इरठे रक्कम समाविष्ट असेल आणि सदर ठेव जमा करण्यास कसूर झाल्यास मालमत्ता पुढे खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. **९.** जर वरीलनुसार प्रारंभिक ठेव जमा केल्यास, देय खरेदी रकमेची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या निश्चित तारखेपासून १५व्या दिवशी किंवा तत्पूर्वी, सदर दिवस वगळता किंवा १५वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टीचा दिवस असल्यास १५व्या दिवसानंतर येणाऱ्या पहिल्या कार्यालयीन दिवशी प्राधिकृत अधिकारींकडे खरेदीदाराद्वारा प्रदान करावयाची आहे. **१०.** वर नमूद केलेल्या कालावधीच्या आत कोणत्याही प्रदानास कसूर झाल्यास मालमत्ता खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. इरठे समाविष्ट ठेव **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**द्वारा जप्त करण्यात येईल आणि कसूर करणारा खरेदीदार मालमत्तेवरील सर्व दावे गमावेल. **११.** कोणत्याही भाराचा सविस्तर तपशील, **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**ला ज्ञात असलेला, ज्याकरिता मालमत्ता पात्र आहे : वरील तक्त्यानुसार. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मालमत्ता करावरील सांविधिक थकीत दायित्वे, विद्युत देय इ. समाविष्ट मालमत्तेवरील भारासंबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. **१२.** कोणत्याही अन्य तपशिलाकरिता किंवा ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण प्रक्रिया याकरिता भावी बोलीदार सेवा-पुरवठाकार 'मेसर्स ४क्लोजर', ब्लॉक नं. ६०५ ए, ६वा मजला, मैत्रिवणम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमिरपेट, हैदराबाद-५०० ०३८, ई-मेल : info@bankauctions.in किंवा मनिष बन्सल, ई-मेल : Manish.Bansal@tatacapital.com प्राधिकृत अधिकारी, मोबाइल नं. ८५८८९८३६९६ यावरून संपर्क साधू शकतील. कृपया तुमच्या शंका वॉट्सॲप नंबर ९९९९०७८६६९ यावर पाठवाव्यात. **१३.** उच्चतर घोषित केलेल्या बोली रकमेवरील उच्चतर बोलीदाराद्वारा १%ची टीडीएस लागू व देय असणार आहे. रक्कम मालक/ ऋणकोच्या पॅनमध्ये उच्चतर बोलीदाराद्वारा भरणे आवश्यक असणार आहे आणि चलनाची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावयाची आहे. **१४.** कृपया वरील तपशिलाकरिता www.https://surl.li/hplcln या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी. **१५.** कृपया या लिंकवरसुद्धा भेट द्यावी : https://www.tatacapital.com/property-disposal.html

**कृपया नोंद घ्यावी :** टीसीएचएफएलने या मालमत्तेच्या विक्री/ लिलावाकरिता नमूद केलेले ऑक्शनिंग पार्टनर वगळता कोणत्याही दलाल/ एजन्टची नियुक्ती केलेली नाही. स्वारस्य असलेल्या पक्षकारांनी या प्रकरणासंबंधित सर्व शंका व चौकशी याकरिता केवळ निम्नस्वाक्षरीकार किंवा प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा.

**स्थळ : नाशिक**
**दिनांक : २१.०४.२०२५**
**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**

## TATA
## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत पत्ता :** ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३.
**शाखा पत्ता :** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, २रा मजला, कंदी टॉवर, सी विंग, जालना रोड, औरंगाबाद-४३१ ००१.

### स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम २००२च्या नियम ९(१) सहवाचता नियम ८(६) अंतर्गत)**

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६) आणि नियम ९(१) सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ३० दिवसांची ई-लिलाव सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार आणि सह-कर्जदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस/ प्रतिनिधी (कर्जदार) यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (टीसीएचएफएल) यांच्याकडे गहाण ठेवली आहे. ज्याचा ताबा टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. दि. २२.०५.२०२५ रोजी ''जसे आहे तिथे'' आणि ''जे आहे तसे'' आणि ''जे काही आहे तसे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांकडून थकबाकी वसूल करण्यासाठी विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत आणि इसारा ठेव अनामत रक्कम खाली नमूद केली आहे. याद्वारे नोटीस दिली जाते की, विक्रीला कोणतीही स्थगिती/ बंद न केल्यास, वरील सुरक्षित संपत्ती/ मालमत्ता ई-लिलावाद्वारे दि. २२.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता विक्री केली जाईल. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी ईएमडीचा डिमाण्ड ड्राफ्ट असलेला मोहोरबंद लिफाफा दि. २१.०५.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ०५.०० वा.पर्यंत टीसीएचएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्याकडे टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, २रा मजला, कंदी टॉवर, सी विंग, जालना रोड, औरंगाबाद-४३१ ००१ या शाखेच्या पत्त्यावर सादर करावा.

खाली वर्णन केलेल्या संक्षिप्त तपशिलांनुसार सुरक्षित मालमत्ता/ स्थावर मालमत्तेची ''जशी स्थिती आहे तशी'' यावर विक्री होईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदार/ सह-कर्जदार, कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी/ जामीनदार यांचे नाव | डिमाण्ड नोटीसनुसार रक्कम | आरक्षित किंमत | इसारा ठेव रक्कम | ताबा प्रकार | थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ९४६०९१३ | श्री. दिलीप जाधव श्रीमती वंदना जाधव | रु. ११,८१,५७७/- (रुपये अकरा लाख एक्याऐंशी हजार पाचशे सत्त्याहत्तर फक्त) ०६.०२.२०२१ | रु. १९,६०,०००/- (रुपये एकोणीस लाख साठ हजार फक्त) | रु. १,९६,०००/- (रुपये एक लाख शहाण्णव हजार फक्त) | भौतिक | रु. २०,४२,६९५/- (रुपये वीस लाख बेचाळीस हजार सहाशे पंचाण्णव फक्त) दि. १४.०४.२०२५ रोजीनुसार |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन : अनुसूची-१** याचे ते सर्व तुकडे आणि पार्सल (प्रकल्पाच्या जमिनीचे वर्णन) मोजमापे ४५५०.०० चौ.मी. जमिनीचा प्लॉट, गट क्र. ५२/१, गाव वडगाव (कोल्हाटी), ता. आणि जि. औरंगाबाद येथे स्थितचे तो सगळा तुकडे आणि पार्सल, **द्वारे मालमत्तेच्या जमिनीच्या सीमाबद्ध : पूर्व :** त्याच गट क्रमांकाची जमीन, **पश्चिम :** भूमीपुत्र सहकारी संस्थेची जमीन, **उत्तर :** त्याच गट क्रमांकात सिडकोला दिलेली जमीन, **दक्षिण :** १८.०० मी. रुंद रस्ता. **अनुसूची-२** (फ्लॅटचे वर्णन) फ्लॅट क्र. १४, तिसऱ्या मजल्यावर, विंग-५, ब- प्रकारची इमारत मोजमापे ३४.९९६ चौ.मी. कार्पेट क्षेत्रफळ ३६.१२५ चौ.मी., बिल्ट-अप क्षेत्रफळ, सारा आकृती फेज-१ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कॉण्डोमिनियममध्ये, मोजमापे ४५५०.०० चौ.मी.वर बांधलेले, गट क्र. ५२/१, गाव वडगाव (कोल्हाटी), ता. आणि जि. औरंगाबाद नोंदणी उपनिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथील **खालीलप्रमाणे सीमाबद्ध : पूर्व :** फ्लॅट क्र. ११, **पश्चिम :** बाजूची सीमान्त जागा, **उत्तर :** फ्लॅट क्र. १३, विंग ०६, **दक्षिण :** फ्लॅट क्र. १३, विंग ०५.

लिलावात, सामान्यतः जनतेला वैयक्तिकरीत्या त्यांच्या बोली सादर करण्यासाठी आमंत्रित केले जाते. तथापि, या विक्रीसंबंधात कोणतेही कर्तव्य बजाविणारे अधिकारी किंवा इतर व्यक्ती, तथापि, विक्री केलेल्या स्थावर मालमत्तेमध्ये कोणतेही व्याज मिळविण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे बोली लावू शकत नाही.

विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मध्ये विहित केलेल्या अटींच्या विषयाधीन आणि पुढील अटींच्या अधीन असेल :

**टीप : मालमत्तेचा ई-लिलाव http://bankauctions.in/ या पोर्टलद्वारे दि. २२.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा.पर्यंत होईल आणि त्यासाठी प्रत्येकी ५ मिनिटांचा मर्यादित विस्तारासह कालावधी असेल.**

**नियम आणि अटी : १.** खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले तपशील हे निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहितीसाठी नमूद केले आहे; परंतु या घोषणेमध्ये कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळलेल्यास निम्नस्वाक्षरीकार उत्तरदायी असणार नाहीत. बोलीच्या रकमेबद्दल किंवा बोलीदाराबाबत कोणताही वाद उद्भवल्यास, स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा अधिकृत अधिकाऱ्यांच्या विवेकबुद्धीनुसार लिलावासाठी ठेवण्यात येईल. **२.** स्थावर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी विक्री केली जाणार नाही. **३.** बोली वाढीची रक्कम असेल : रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त). **४.** मालमत्तेच्या खरेदीसाठी सादर केलेल्या सर्व बोली ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''च्या नावे शाखेच्या पत्त्यावर देय असलेले डिमाण्ड ड्राफ्टद्वारे वर नमूद केल्याप्रमाणे बयाणा रकमेसह असतील. डिमाण्ड ड्राफ्ट लिलावानंतर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील. एनईएफटी/ आरटीजीएस/ आयएमपीएसच्या माध्यमातून ईएमडी भरण्यासाठी कृपया अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधा. **५.** सर्वोच्च बोली लावणारा यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केला जाईल. जर तो/ ती कायदेशीररीत्या बोली लावण्यासाठी पात्र असेल आणि पुढे दिलेली रक्कम राखीव किमतीपेक्षा कमी नसेल. जेव्हा प्रस्ताव केलेली किंमत इतकी स्पष्टपणे अपुरी दिसते की, असे करणे अयोग्य होईल तेव्हा सर्वोच्च बोली स्वीकारण्यास नकार देणे हे अधिकृत अधिकाऱ्यांच्या विवेकबुद्धीनुसार असेल. **६.** नोंदविलेल्या कारणास्तव, विक्री स्थगित/ बंद करणे अधिकृत अधिकाऱ्यांच्या विवेकबुद्धीनुसार असेल. **७.** स्थावर मालमत्तेची तपासणी दि. १४.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते सायं. ०५.०० वा. या वेळेत पूर्वभेट निर्धारित करून केली जाऊ शकते. **८.** यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केलेल्या व्यक्तीने, अशा घोषणेनंतर लगेच, खरेदीच्या रकमेच्या/ बोलीच्या रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम २४ तासांच्या आत अधिकृत अधिकाऱ्यांकडे इसारा ठेव अनामत रक्कम जमा करावी आणि अशा ठेवीमध्ये कसूर झाल्यास, खासगी कराराद्वारे मालमत्ता ताबडतोब नव्याने लिलाव/ विक्रीसाठी ठेवली जाईल. **९.** वरीलप्रमाणे प्रारंभिक ठेव ठेवल्यास, देय असलेल्या खरेदीच्या पैशांची शिल्लक रक्कम खरेदीदाराने मालमत्तेच्या विक्रीच्या पुष्टीकरणाच्या तारखेपासून १५व्या दिवशी किंवा त्यापूर्वी अशा दिवसाशिवाय किंवा जर १५वा दिवस रविवार किंवा इतर सुट्टीचा असेल तर १५व्या दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी अधिकृत अधिकाऱ्याला अदा केली पाहिजे. **१०.** वर नमूद केलेल्या कालावधीत कोणतेही पेमेन्ट चुकल्यास, खासगी कराराद्वारे मालमत्तेचा नवीन लिलाव/ विक्री करण्यात येईल. टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारे ईएमडीसहित ठेवी जप्त केल्या जातील आणि कसूर करणारा खरेदीदार मालमत्तेवरील सर्व दावे गमावेल. **११.** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.ला ज्ञात असलेल्या कोणत्याही भारांचे तपशील, ज्यासाठी मालमत्ता जबाबदार आहे : वरील सारणीनुसार. दावे, जर असेल तर, जे मालमत्तेवर सादर केले गेले आहेत आणि त्याचे स्वरूप आणि मूल्य यांच्याशी संबंधित इतर ज्ञात तपशील : वरील सारणीनुसार. इच्छुक बोलीदाराला मालमत्ता कर, वीज इत्यादींच्या वैधानिक दायित्व क्षेत्रासह मालमत्तेवरील बोजांबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करण्याचा सल्ला दिला जातो. **१२.** इतर कोणत्याही तपशिलांसाठी किंवा ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण प्रक्रियेसाठी संभाव्य बोलीदार सेवा प्रदात्याशी संपर्क साधू शकतात, मेसर्स ४क्लोजर, ब्लॉक नं. ६०५ अ, ६वा मजला, मैत्रिवनम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमिरपेट, हैदराबाद-५०० ०३८, ई-मेल : info@bankauctions.in किंवा **मनीष बन्सल, ई-मेल आयडी : Manish.Bansal@tatacapital.com**. अधिकृत अधिकारी, मोबाइल क्र. ८५८८९८३६९६. कृपया तुमची शंका व्हॉट्सॲप नंबर- ९९९९०७८६६९ यावर पाठवा. **१३.** सर्वाधिक घोषित बोलीच्या रकमेपेक्षा सर्वाधिक बोली लावणाऱ्याला १% टीडीएस लागू होईल आणि देय असेल. सर्वात जास्त बोली लावणाऱ्याने मालक/ कर्जदाराच्या पॅनमध्ये पेमेन्ट जमा करणे आवश्यक आहे आणि चलनाची प्रत आमच्या कंपनीकडे सादर केली जाईल. **१४.** वरील तपशिलांसाठी कृपया सुरक्षित धनकोची वेबसाइट **www.https://surl.li/vmokpu** यामध्ये दिलेल्या खालील लिंकचा संदर्भ घ्या. **१५.** कृपया **https://www.tatacapital.com/property-disposal.html** या लिंकलादेखील भेट द्या.

**कृपया नोंद घ्या :** टीसीएचएफएल यांनी या मालमत्तेच्या विक्री/ लिलावासाठी नमूद केलेल्या लिलाव भागीदाराव्यतिरिक्त कोणताही दलाल/ एजन्ट नियुक्त केलेला नाही. इच्छुक पक्षांनी या प्रकरणातील सर्व शंका आणि चौकशीसाठी फक्त निम्नस्वाक्षरीकारांशी किंवा अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**ठिकाण : औरंगाबाद**
**दिनांक : २१.०४.२०२५**
**सही/- अधिकृत अधिकारी,**
**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**